# बोलका मुका चेहरा

मी लेक्चर संपविले व सुटकेचा निश्वास  टाकला. मुले-मुली भरा-भर वर्गाच्या बाहेर पडली. मीही वह्या पुस्तके  आवरून  होस्टेलच्या दिशेने चालू लागले. रोज संशोधनाचा अभ्यास, अर्धवेळ शिकविण्याचे काम यामुळे मी थकून थकून जात असे पण नाईलाज होता. आज  हवेमध्ये गारवा जरा अधिक जाणवत होता, कधी एकदा होस्टेलवर पोहोंचेन असे झाले होते. होस्टेलवर पोहोंचले, रूमच्या दिशेने वळलेली पावलं एकदम थबकली. लेटर-बॉक्स उघडून पाहण्याची  आठवण आली. होस्टेलच्या मुख्य दरवाज्यातून आत शिरताच उजव्या हाताला रिसेप्शन डेस्क व त्याभोवती असलेल्या कपाटांच्या कप्प्यांमध्ये होस्टेलमधील प्रत्येक मुला-मुलींसाठी खोलीक्रमांक असलेली छोटीशी पत्रपेटी. परदेशातून आलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना या पत्रपेटीबद्दल अत्यंत जिव्हाळा कारण घरून येणारी पत्रं हा त्यांचा खरा मानसिक आधार असे. सर्व मायेच्या माणसां-पासून हजारों मैल दूर असल्यावर घरचे पत्र आले की, प्रत्यक्ष घरचे माणूस भेटल्याचा आनंद जाणवत असे. रोजच घरचे पत्र यावे, ही माझी इच्छा अव्यवहारी, बालिश आहे हे उमगत असूनही रोज अधीऱ्या हातांनी पत्र-पेटी उघडली जाई व ती रिकामी दिसली की, दिवसभराचा थकवा अधि-कच जाणवू लागे. पत्र आले का ते पाहण्याचा जणू छंद जडला होता. त्या-मुळे आजही रुमच्या दिशेने निघालेली मी लेटर-बॉक्सकडे वळले. उत्सु-कतेने पत्रपेटीचे चिमुकले दार उघडले पण  निराश झाले. आत पत्र नव्हतं, पण होस्टेलचे महिन्यातून दोनदा प्रसिद्ध होणारे बातमीपत्र होते. होस्टे-लचे बातमीपत्र म्हणजे विरंगुळा असायचा. बातमीपत्रात परीक्षांच्या तारखा, फी भरण्याची शेवटची तारीख, कुणाचा तरी छोटासा लेख, कविता

किंवा विनोद, होस्टेलमध्ये होणाऱ्या पार्टीजच्या तारखा, होस्टेलमध्यें घडलेल्या महत्वाच्या घटना, दाखविल्या जाणाऱ्या आगामी चित्रपटाची जाहिरात इत्यादी मजकूर असे. थोड्याशा नाराज मनानेच मी बातमीपत्र घेतले व न उघडता रुममध्ये गेले, वॉश घेतला व बातमीपत्रात काही गोष्टी महत्त्वाच्या व आवश्यक असत म्हणून ते नजरेखालून तरी घालावे म्हणून मी ते चाळू लागले, आणि चाळता-चाळता एका जाहिरातीने माझे लक्ष वेधून घेतले. मजकूर पुढीलप्रमाणे होता.

स्वयंसेवक पाहिजे.

हात, पाय लुळे असलेल्या, होस्टेलमधील एका मुक्या मुलास जेवण भरविण्यासाठी स्वखुशीने आपली सेवा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनीने, होस्टेलच्या प्रमुख चालकांना संध्याकाळी ६ ते ७ या वेळात भेटावे.

ती जाहिरात वाचताच मला तो मुलगा आठवला. त्याची स्वयंचलित व्हील चेअर चालविण्यासाठी वेगवेगळी बटने होती. त्याच्या लुळ्या बोटांना धातुच्या पट्ट्या लावलेल्या होत्या. या धातुमय बोटांनी तो खुर्चीची बटने ऑन करुन विद्यापिठात हिंडत असे, कॅफेटेरियात येत असे. हे सर्व करताना त्याला निश्चितच त्रास होत असे. पण आपल्या अपंगत्वावर मात करण्याची जिद्द त्या खुर्चीने आणि त्या बोटांनी त्याला दिली होती. अनेकदा मी त्याला कॅफेटेरियाच्या अन्नपदार्थ ठेवलेल्या विभागात पाहिले होते. तेथे काम करणाऱ्यांपैकी कुणीतरी ट्रे घेऊन, त्याच्याबरोबर फिरुन त्याने दाखविलेले पदार्थ प्लेट मध्ये ठेवून, तो ट्रे तेथल्या टेबलावर नेऊन ठेवीत असे. वेळेनुसार दोन-चार घास त्याला भरवी व घाईघाईने निघून जाई. ते दृश्य बघून मला वाईट वाटे. मला आठवते, एखादा त्याला ठसका लागला होता, बाकडी स्ट्रॉ असलेल्या त्याच्या वाटलीत पाणी ओतून, पाणी पाजीपर्यंत तो कासावीस झाला होता. खुर्चीने त्याला फक्त संचाराची सोय उपलब्ध करुन दिली होती, परंतु हातातोंडाची गाठ पडणे मात्र शक्य नव्हते. एकंदरीत या सगळ्या प्रकारामुळे त्याची उपासमारच होत असावी, तेव्हा त्याला भरविण्यासाठी कुणाची तरी मदत अत्यावश्यक आहे हे जाणवून होस्टेलच्या संचालकांनी ही जाहिरात दिली असावी.

डोळ्यांवर झोप आली तरी मी विचार करीतच होते. एकदम

काहीतरी निश्चय करीत मी उठले, माझी डायरी उघडून वेळापत्रक पाहिले व या मुलाला वेळ देता येईल का ? याचा विचार करू लागले. सकाळी डिपार्टमेन्टमध्ये गेले की, संध्याकाळीच परतणे शक्य होई, कारण अर्ध-वेळ शिकविणे, स्वत:च्या अभ्यासाची लेक्चर्स, ग्रंथालयात संशोधनासाठी घालवावा लागणारा वेळ, होस्टेल ते डिपार्टमेंट हे अंतर रोज दोनदा चालून जाणेयेणे व संध्याकाळी दोन तास रिसेप्शन डेस्कवर करायचे काम. वेळ असता तर बरे झाले असते असे वाटले पण इच्छा असूनही मी त्या जाहिरातीला प्रतिसाद देऊ शकले नाही. बघू या, पुढच्या टर्ममध्ये वेळापत्रक ॲडजेस्ट करून घेऊ. नक्कीच कुणीतरी या मुलाला मदत करायला तयार होईल या विचाराने स्वत:चे समाधान करुन घेतले.

वीकएन्ड आला, अमेरिकन विद्यार्थ्यांना बेहोष करण्याची जादू असलेला शनिवार, रविवार मात्र माझ्यासाठी चिक्कार कामे घेऊन येई. घरी पत्र लिहीणे, होमवर्क संपविणे, टर्म पेपर्स टाईप करणे या कामामध्ये त्या मुलाचा विचार देखील मनात आला नाही. सोमवारी नेहमीप्रमाणे तासाला निघाले आणि मला तो त्याच्या व्हीलचेअरवरून जाताना दिसला. जाहिरातीला प्रतिसाद मिळाला की, नाही देव जाणे. मी ठरविले, आज त्याला मदत मिळाली कां हे शोधून काढायचेच.

रोज संध्याकाळी सातच्या आत संध्याकाळचे जेवण घ्यावे लाग. आज जरा उशीरच झाला होता. भराभरा काही खाद्यपदार्थ प्लेटमध्ये वाढून घेतले. प्लेट ट्रेमध्ये ठेवली व कोपऱ्यातील एका टेबलाजवळ जाऊन ट्रे टेबलावर ठेवला. पिण्याच्या पाण्याचा पेला भरुन आणला व खुर्चीवर बसून पहिला घास घेतला नि एकदम थबकले. दूर कोपऱ्यामध्ये त्याची व्हीलचेअर दिसली, तो पाठमोरा होता. मुलांच्या गर्दीतून वाट काढीत मी त्याच्या टेबलाजवळ जाऊन पोहोंचले व जेवणाचा ट्रे, त्या टेबलावर ठेवीत म्हणाले, 'May I Join you ?' " Most Certainly' त्याला आस्थेने जेवण भरविणाऱ्या गोड चेहऱ्याच्या मुलीने हसून प्रत्युत्तर दिले. स्थिर न राहणारी मान कशीबशी सावरून मोठ्या समाधानाने तो जेवत होता. त्याला अभिवादन करीत मी म्हणाले, 'तुम्हाला ही मदत मिळाली याचा मला आनंद वाटतोय.' ' मी मदत करीत नाही, मी माझे कर्तव्य करीत

आहे,' ती मुलगी पटकन म्हणाली. मला कुणीतरी चपराक मारल्यासारखे वाटले. 'That's nice, someone should do it' मी अपराधी-पणाची भावना लपवीत म्हटले व अन्यमनस्कपणे जेवायला सुरुवात केली. एवढ्यात जेवण भरविताना, तिच्या हातून चमचा सुटला व खाली पडला. ती वाकून चमचा घेण्याचा प्रयत्न करणार तोच मी म्हणाले, 'Allow me.' व दुसरा चमचा काऊंटरवरून आणून देण्यासाठी मी उठले. जाण्यापूर्वी जमिनीवर पडलेला चमचा उचलून बेसीनमध्ये टाकावा म्हणून खाली वाकले. क्षणभर नजर थिजल्यासारखी झाली. ती मुलगी अपंग होती. तिला पाय नव्हते. मी तिला नवीन चमचा आणून दिला. कसेबसे जेवण संपविले व त्या दोघांचा निरोप घेऊन रुमकडे निघाले. डोळ्यासमोर सतत येत होती हातपाय नसणाऱ्या मुलाला भरविणारी, पाय नसलेली पण हात सलामत असलेली ती सुन्दर मुलगी. आणि मला वाटले अनेक अपंग मनांच्या अमेरिकेत मनाने अपंग नसलेली ही एकच मुलगी आहे. डोळ्यां-च्या कडा नकळत पाणावल्या. शरीराने अपंग पण मनाने समृद्ध असलेल्या ह्या दुर्मिळ अमेरिका-दर्शनाने मला मूक केले आणि चालता-चालता मला वाटू लागले की, मीच अपंग आहे.

♣

**– डॉ. उषादेवी विजय कोल्हटकर**

**('अमेरिका किती मोठी ? किती छोटी ?' या कथासंग्रहातून)**